# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २७० - २३ दिनांक : - २१/०८/२०२३

## !! सायबर जनजागृती कार्यक्रम !!

### St.Joseph High School, Virar (West) येथे सायबर गुन्हे कक्षाकडून सायबर जनजागृती व्याख्यानाचे आयोजन !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील विदयार्थी, नागरिकांमध्ये सायबर गुन्हयांचे अनुषंगाने जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याबाबत मा. पोलीस आयुक्त यांनी आदेशित केलेले होते.

मा.पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय यांचे संकल्पनेतून आयुक्तालयातील विद्याथी, नागरिकांमध्ये सायबर गुन्हे विषयक जनजागृती व्हावी या उद्देशाने याकरीता सेंट जोसेफ माध्यमिक विदयालय, होली स्पिरीट क्रिडा मंडळ, नंदाखाल व सायबर गुन्हे कक्ष,मि.भा.व.वि. यांचे संयुक्त विदयमाने दिनांक १९ ऑगस्ट २०२३ रोजी सायंकाळी १६.३० वाजता ते १८.३० वाजेपावेतो सायबर गुन्हे विषयक जनजागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर सायबर जनजागृती व्याख्याना दरम्यान सायबर गुन्हे कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर व अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री. अमर मराठे, सायबर व्हॉलेंटीयर प्रणित मेझ्रेस यांनी खालील विषयांवर १८ ते ६० वयोगटातील व्यक्तींना मार्गदर्शन केले आहे.

१. सद्यस्थितीत घडणारे वेगवेगळे सायबर गुन्हे (**Trending Cyber Crimes.**)
२. सोशल मिडीया संदर्भात घडणारे गुन्हे (**Social Media Related crimes**)
३. ऑनलाईन सायबर गुन्हयास कश्याप्रकारे टाळता येईल याबाबतची माहिती (**Precautions to be Taken.**)
४. ऑनलाईन गुन्हयास बळी पडल्यास तात्काळ कोठे व कश्याप्रकारे तक्रार नोंदवावी याची माहिती (**Where and How to complaint.**)
५. अंमली पदार्थ सेवनाचे दुष्परीणाम जनजागृती याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. (**Public awareness about the side effects of drug abuse**)

तसेच सायबर गुन्हयांसदर्भात असलेले गैरसमज, त्यांचे प्रश्नांचे निरसन करण्यात आले. नमूद कार्यक्रम स्थानिक युटयुब चॅनलद्धारे प्रसारीत करण्यात आला असल्याने मोठया प्रमाणावर नागरिंकामध्ये जनजागृती करण्यात आली आहे. सदर सायबर जनजागृती व्याख्यानाकरीता सेंट जोसेफ माध्यमिक विदयालयाचे अध्यक्ष/प्राचार्य फादर थॉमस डिसोजा, अध्यक्ष श्री. अँड्रयू लोपीस, सुत्रसंचालक श्री. प्रशांत रॉड्रीग्ज, २५० नागरिकांनी सहभाग नोंदविला आहे.

तरी मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरिकांना जाहिर आवाहन करण्यात येते की, सायबर गुन्हयांसदर्भात कोणत्याही इसमाची फसवणूक झाली असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cyberpolice.gov.in अथवा 1930 हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार नोंदवावी.